# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३७२/प्रनिप्रा/१८डिसेंबर/२०२४/6317 दिनांक : 23 DEC 2024

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. न्या. वि.एल. अचलिया (से.नि.) (अतिरिक्त कार्यभार), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), २) वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई (दूरदृष्यप्रणालीद्वारे), ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ४) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे अनुपस्थित होते.

तसेच डॉ. संदिप काळे, सहा. प्राध्यापक, आयुष संचालनालय, मुंबई २) डॉ. किशोर मडावी, सहा. प्राध्यापक, आयुष संचालनालय, मुंबई, ३) डॉ. जी. टी. केदार, परिक्षा समन्वयक, सीईटी कक्ष व ४) डॉ. साळे, संचालनालय, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) हे संबंधित संचालकांच्या वतीने विशेष निमंत्रित म्हणुन प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त भाग - १ (शैक्षणिक विभाग) व भाग - २ (प्रशासकीय विभाग) नुसार पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ :** **प्राधिकरणाच्या दिनांक २०/०८/२०२४, २१/०८/२०२४, ५/०९/२०२४, २३/०९/२०२४, ७/१०/२०२४, २५/१०/२०२४ व ३१/१०/२०२४ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

प्राधिकरणाच्या दिनांक २०/०८/२०२४ व २१/०८/२०२४ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या तत्कालीन मान. सदस्य यांना पाठवून त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

आले. दिनांक ५/०९/२०२४, २३/०९/२०२४, ७/१०/२०२४, २५/१०/२०२४ व ३१/१०/२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले.

**विषय क्रमांक २ : प्राधिकरणाच्या दिनांक २०/०८/२०२४, २१/०८/२०२४, ५/०९/२०२४, २३/०९/२०२४, ७/१०/२०२४, २५/१०/२०२४ व ३१/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २०/०८/२०२४, २१/०८/२०२४, ५/०९/२०२४, २३/०९/२०२४, ७/१०/२०२४, २५/१०/२०२४ व ३१/१०/२०२४ रोजी झालेल्या बैठकींच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या अहवालाचे अवलोकन करण्यात आले. या संदर्भात दिलेल्या सुचनेनुसार सदर अहवाल विस्तृतपणे तयार करुन फेरसादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्ष यांनी दिले. त्यानुसार कार्यवाही करुन अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात यावा.

**विषय क्रमांक ३ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये EWS संवर्गात प्रवेशित परंतू विहित नमुन्यामध्ये EWS प्रमाणपत्र सादर न केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.**

प्रस्तूत प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी खालील माहिती प्राधिकरणास अवगत केली,-

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा मधील तंत्रशिक्षण विभागातील विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी जसे की, बी.ई./बी.टेक., एमबीए, एमसीए, डीएसई, डीएसपी, बी.आर्क. इ. अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. सदर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया शासन मान्य शैक्षणिक वर्ष २०२४-२५ माहिती पुस्तिकेमधील प्रवेशाविषयक नियमांच्या अधिन राहून राबविण्यात आली. सदर माहिती पुस्तिकेमधील नियम क्रमांक ७(६)(d) मध्ये नमुद सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक राआधो/४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक ३१.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार १० टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)प्रवर्गातील उमेदवारांकरीता राखीव ठेवण्यात आलेल्या होत्या. ज्या उमेदवारांनी EWS प्रवर्गातून प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी झाले होते, अशा उमेदवारांनी माहिती पुस्तिकेमधील नमुद प्रोफॉर्मा-V या नमुन्यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते.

त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील उमेदवारांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता १० टक्के आरक्षण विहित करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २२ जुलै, २०२४ च्या शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५ नुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे.

तसेच काही उमेदवारांनी केंद्र सरकारचे नमुन्यातील EWS प्रमाणपत्र अपलोड करुन प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता अपलोड करण्यात आलेले केंद्र सरकारच्या नमुन्यातील EWS प्रमाणपत्र ऐवजी माहिती पुस्तिकेतील दिलेल्या प्रोफॉर्मा-व्ही या नमुन्यामध्ये आर्थिकदृष्ट्या

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठीचे प्रमाणपत्र अपलोड करण्यासाठी ९० दिवसाची मुदत देण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक २३.०९.२०२४ रोजीच्या बैठकीत निर्णय घेतला. सदर मुदत दिनांक १४/१२/२०२४ पर्यंत संपत होती. त्याअनुषंगाने आजतागायत तंत्र शिक्षण विभागाच्या अभ्यासक्रमामधील अचूक नमुन्यातील EWS प्रमाणपत्र अपलोड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मुदत वाढ देण्यात आलेली उमेदवारांची संख्या | अपलोड करण्यात आलेले प्रमाणपत्रांची संख्या | अद्याप अपलोड करण्यात आलेले नसल्याचे प्रमाणपत्राची संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | बी.ई./बी.टेक. | ४६८ | १५३ | ३१५ |
| २. | एमबीए | ४५२ | ३४ | ४१८ |
| ३. | एमसीए | २२९ | १८ | २११ |
| ४. | डीएसई | २९९ | ३६ | २६३ |
| ५. | डीएसपी | २८३ | १०२ | १८१ |
| ६. | बी.आर्क | ३७ | ४ | ३३ |
| | **एकूण** | **१७६८** | **३४७** | **१४२१** |

सदरील प्रमाणपत्र अपलोड करण्याची अंतिम मुदत दिनांक१४/१२/२०२४ रोजी असून अद्याप पर्यंत १७६८ उमेदवारांपैकी ३४७ उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र सादर केले आहेत. उर्वरीत १४२१ प्रमाणपत्र अप्राप्त आहे.

जे उमेदवार SEBC प्रवर्गामधील असून SEBC प्रवर्गाचा लाभ न घेता काही उमेदवारांनी केंद्रभूत प्रवेश प्रक्रिये मध्ये EWS प्रवर्गामधून अर्ज सादर केलेले होते, त्यापैकी काही उमेदवारांना संबंधित तहसीलदार यांनी EWS प्रमाणपत्र देण्यास असमर्थता दाखवली आहे, असे उमेदवारानी स्वतः राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षास उपस्थित राहून मौखिक सांगितले आहे.

तसेच सदरील प्रकरणी चार उमेदवारांनी मा. उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल केलेल्या असून मा. उच्च न्यायालयाने ०२ प्रकरणामध्ये संबंधीत तहसीलदार कार्यालयांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र योग्य नमुन्यामध्ये जारी करण्यात यावे, असा आदेश दिला आहे. त्याअनुषंगाने दोन उमेदवारांना संबंधीत तहसिल कार्यालयाने विहित नमुन्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेले असून उमेदवारांनी सदर प्रमाणपत्र प्रवेश प्रक्रिया प्रणालीमध्ये उपलब्ध करुन दिलेले आहे. त्याचप्रमाणे एका प्रकरणामध्ये उपरोक्त कारणांसाठी याचिका कर्त्यांचा प्रवेश रद्द करण्यात येवू नये असे आदेश देण्यात आलेले आहेत. पुढील सुनावणी दिनांक २८/०२/२०२५ रोजी आहे. इतर एका उमेदवाराची प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र रा...

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता सामाईक प्रवेश परीक्षांकरीता उमेदवारांची नोंदणी करतेवेळी SEBC प्रवर्गाकरीता आरक्षण लागू नव्हते. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या वेळी SEBC प्रवर्गाकरीता आरक्षण लागू करण्यात आले. दरम्यानच्या कालावधीमध्ये काही तहसील कार्यालयानी सदर प्रवर्गातल उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले. काही तहसील कार्यालयानी या प्रवर्गातील उमेदवारांना EWS प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही. यामुळे काही उमेदवारांनी याबाबत मा.न्यायालयात याचिका दाखल केलेल्या आहेत व मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सदर उमेदवारांना संबंधीत तहसील कार्यालयांनी EWS प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेले आहेत. सदर कालावधी हा उमेदवारांकरीता संक्रमण कालावधी होता.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत तंत्रशिक्षण विभागा सोबत इतर संचालनालयाच्या जसे की, उच्च शिक्षण, कृषी शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि कला शिक्षण या विभागांमधील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेल्या असून उच्च शिक्षण विभागांने एका प्रकरणी ज्या उमेदवारांनी केंद्र शासनाच्या नमुन्यामधील (EWS) प्रमाणपत्र सादर केलेले होते त्याचा प्रवेश रद्द करण्यात आलेला आहे. तसेच अशा प्रकारच्या अडचणी भविष्यामध्ये विविध विभागांच्या प्रमाणपत्र पडताळणी व प्रवेश निश्चितीच्या वेळेस उद्भवू शकतात.

प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन प्रस्तूत प्रकरणी सांगोपांग चर्चा करण्यात आली व तद्नुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमास आर्थिकदृष्टया दुर्बल घटक संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांना विहित नमुन्यामध्ये EWS चे प्रमाणपत्र सादर करण्याकरिता दिनांक १४/१२/२०२४ रोजी पासून पुढील ०२ महिन्याची मुदतवाढ संबंधित विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.

तसेच प्रस्तूत विद्यार्थ्यांना EWS चे प्रमाणपत्र त्वरीत उपलब्ध करुन देण्यासाठी शासन स्तरावरुन संबंधितांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.

तसेच पुढील शैक्षणिक वर्षापासून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीनुसार विहित नमुन्यामध्ये आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांचा विहित नमुना हितसंबंधित घटकांच्या माहितीकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून परिपत्रक जारी करण्यात यावे. जेणेकरुन भविष्यात राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सुसुत्रीतपणा येईल.

**विषय क्रमांक ४ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यता प्रस्ताव / पुनर्विलोकन अर्ज प्राप्त महाविद्यालयांचे (एकुण १३९ महाविद्यालये/प्रपत्र-अ) प्रवेश मान्यता प्रस्ताव मान्यतेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उशीराने प्राप्त प्रवेश मान्यता प्रस्ताव / पुनर्विलोकन अर्ज प्राप्त झालेल्या महाविद्यालयांची अभ्यासक्रम/ संचालनालय निहाय संचालनालयाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ५ :** **मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अभ्यासक्रम-निहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर (यादी संलग्न).**

सदरील प्रकरणी चर्चा करण्यात येऊन पुढील बैठकीत संबंधीत संचालनालयांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत संचालनालय/अभ्यासक्रम निहाय प्रकरणे प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ६ :** **रत्नदिप फाऊंडेशन, अहमदनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद व नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

रत्नदिप मेडिकल फाऊंडेशन व रिसर्च सेंटर, रत्नापुर, ता. जामखेड, जिल्हा - अहमदनगर या संस्थेचे रत्नदिप आयुर्वेद मेडिकल कॉलेज, अहमदनगर व रत्नदिप नर्सिंग कॉलेज, अहमदनगर यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क अदा केले असून प्रवेश मान्यते प्रकरणी संचालनालय आयुष शिक्षण, मुंबई व संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे अनुक्रमे दिनांक २९/०४/२०२४ व ११/१०/२०२४ रोजीचे प्रवेश पडताळणी अहवाल प्राधिकरणास प्राप्त झालेले आहेत.

सदरचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये झालेले असून अधिनियम २०१५ मधिल तरतूदींच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधिल प्रवेश प्रक्रियेच्या माध्यमातून करण्यात आलेले प्रवेश संबंधित संचालकांच्या तपासणी अहवालानुसार प्रवेशित झालेल्या संस्थेमध्ये झालेल्या प्रवेश प्रक्रियेस मान्यता देणे उचित राहील. अधिनियम २०१५ मधिल तरतूदींनुसार मान्यता झाल्यानंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक च्या दिनांक ४/०९/२०२४ रोजीच्या पत्राप्रमाणे स्थलांतरीत करण्यात आलेले प्रवेश नियमित करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे.

रत्नदिप फाऊंडेशनचे, अहमदनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद व नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत विविध महाविद्यालयांमध्ये स्थलांतर करण्यात आलेले आहे.

सदरील संस्थेमध्ये पदवी आयुर्वेद व पदवी नर्सिंग अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी अनुक्रमे संचालक, आयुष संचालनालय, मुंबई व संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांनी करुन शिफारस अहवाल प्राधिकरणास सादर केला होता. याशिवाय सदरील प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक कागदपत्रे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेमार्फतासुद्धा तपासण्यात आलेली आहेत. तरी संबंधित संचालनालये व विद्यापीठ यांच्या तपासणी अहवालांनुसार रत्नदिप फाऊंडेशनचे, अहमदनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद व नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेशित विद्यार्थी संख्या | प्रवेश मान्यता देण्यात आलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | रत्नदिप आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, अहमदनगर | पदवी आयुर्वेद | ९४ | ९४ |



अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रम | प्रवेशित विद्यार्थी संख्या | प्रवेश मान्यता देण्यात आलेली विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| २. | रत्नदिप नर्सिंग मेडिकल कॉलेज, अहमदनगर | पदवी नर्सिंग | २७ | २७ |

**विषय क्रमांक ७ : शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये एकूण २१ महाविद्यालयांनी व्यावसायिक प्रथम वर्ष पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे प्रवेश शासनामार्फत घेण्यात आलेली सामाईक प्रवेश परीक्षा व खाजगी महाविद्यालयांच्या असोसिएशन मार्फत घेण्यात आलेली सामाईक प्रवेश परीक्षा या दोन्ही परीक्षेच्या उत्तीर्ण उमेदवारांमधून करण्यात आलेले होते. सदरील २१ महाविद्यालयांचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | लेट केदारी रेडेकर आयुर्वेदिक महाविद्यालय, कोल्हापूर | १८ |
| २. | श्री. अण्णासाहेब डांगे आयुर्वेद मेडिकल कॉलेज, सांगली | १५ |
| ३. | नालासोपारा आयुर्वेद मेडिकल कॉलेज, ठाणे | १५ |
| ४. | रामराव पाटील आयुर्वेद महाविद्यालय, परभणी | १३ |
| ५. | लोकनेते राजारामबापू पाटील आयुर्वेदिक महाविद्यालय, सांगली | १० |
| ६. | श्री सप्तश्रृंगी आयुर्वेद महाविद्यालय आणि हॉस्पिटल, नाशिक | ०४ |
| ७. | डॉ. जे. जे. मगदूम आयुर्वेद महाविद्यालय, कोल्हापूर | १५ |
| ८. | यशवंत आयुर्वेदिक महाविद्यालय, कोडोली | २९ |
| ९. | यशवंतराव चव्हाण आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, औरंगाबाद | २९ |
| १०. | श्रीमती विमलादेवी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, चंद्रपूर | ०६ |
| ११. | भाऊसाहेब मुळक आयुर्वेद महाविद्यालय आणि रिसर्च सेंटर, नागपूर | ०१ |
| १२. | एस्.एम्.बी.टी आयुर्वेद कॉलेज, नाशिक | ०३ |
| १३. | रुरल इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद आणि रिसर्च सेंटर, सातारा | १४ |
| १४. | के.आर्.पांडव आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर | ०१ |
| १५. | मांजरा आयुर्वेद महाविद्यालय, लातूर | ०३ |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १६. | सौ. शांतादेवी वेदप्रकाश पाटील आयुर्वेद कॉलेज आणि रिसर्च इंन्स्टिट्यूट, हिंगोली | १० |
| १७. | ज्युपिटर आयुर्वेद मेडिकल कॉलेज, नागपूर | ०७ |
| १८. | हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, कोल्हापूर | १५ |
| १९. | महादेवराव शिवणकर आयुर्वेद मेडिकल कॉलेज, गोंदिया | १० |
| २०. | के.डी.एम्.जी आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव | १९ |
| २१. | डॉ. वंदनाताई ढोण ग्रामीण आयुवेद महाविद्यालय, अकोला | ०१ |

मान. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १३/०४/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये सदर प्रकरणी चर्चा करण्यात आली. संबंधित प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता मान. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १३/०४/२०१६ रोजीच्या बैठकीमधील विषय क्र. ४ मधील बाब क्र. ४ (A) मधील निर्णयान्वये, शासनामार्फत घेण्यात आलेली सामाईक प्रवेश परीक्षा व खाजगी महाविद्यालयांच्या असोसिएशन मार्फत घेण्यात आलेली सामाईक प्रवेश परीक्षा अशा दोन्ही सामाईक प्रवेश परीक्षेमधील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले. हे तत्कालीन प्रवेश नियमांच्या विरुद्ध होते. त्यामुळे अशा महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना रु.५०,०००/- प्रति विद्यार्थी इतका दंड भरण्याच्या अटीच्या अधिन राहून सदर प्रवेशांना मान्यता देण्यात आली होती. तत्कालीन प्राधिकरणाचा निर्णय खालील प्रमाणे आहे,-

"………It is noticed that Directorate of AYUSH in its verification report pointed out that following colleges used both lists of MH-CET-2015 and Asso-CET-2015 during the admission process which was against the set procedure and it is serious in nature and the same should not happen in future, which may be noted by the colleges. The details received from Directorate of AYUSH, vide letter No. आसंमु/राजपत्रप्रसिध्द/विनाअनु./प्रवेश/मान्यता/प्रस्ताव/२०१५/आयु-२, dated 31/03/2016 are as under:-

In view of the above, after deliberations, as a one time measure and in the interest of students, the Authority decides to approve above admissions for the Academic Year 2015-16, ***subject to payment of penalty of Rs. 50,000/- per student.*** The Authority further directs that the said permission is granted only for the Academic Year 2015-16 and the Colleges/Institutes should not treat it as a precedent for the years to come."

तसेच, आकारण्यात आलेला दंड, बैठकीचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झाल्यापासून चार आठवड्यांमध्ये भरण्याचे निर्देश देण्यात आले होते.

मान. तत्कालीन प्रवेश नियंत्रण समितीच्या (अधिनियम, २०१५ कलम ९(३) प्रमाणे प्रदान केलेल्या अधिकार) उपरोक्त नमूद निर्देशान्वये एकूण २१ महाविद्यालयांपैकी १४ महाविद्यालयांनी दंडाच्या रकमेची पुर्तता प्राधिकरणास केली. त्यामुळे अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत संबंधित

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

विद्यापीठ व महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे. उर्वरित ०७ महाविद्यालयांनी त्यांच्या असोसिएशनच्या माध्यमातून प्राधिकरणाच्या निर्णयाविरोधात मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली.

सदर प्रकरणी महाविद्यालयांमार्फत मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेली याचिका मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुषंगाने, मान. उच्च न्यायालय, मुंबई यांनी न्यायालयीन याचिका क्र. ४४६१/२०१६, दिनांक १३/१२/२०२२ रोजी खालीलप्रमाणे निर्देश पारित केले व सदर प्रकरण मान. न्यायालयाने निकाली काढण्यात आले.

*"...... As the request is made for withdrawal of the petition, the petition is permitted to withdraw. The ARA may take a decision on the reliefs, which is sought by the petitioners in accordance with law.*

*4. The writ Petition is accordingly disposed of as withdrawn. In view of the disposal of the petition, interim application also stands disposed of."*

त्यानुषंगाने संबंधित ०७ महाविद्यालयांना न्यायालयीन आदेशाच्या अनुषंगाने दंडाच्या रकमेचा भरणा, प्राधिकरणाचे दिनांक १६/१०/२०२४ रोजीचे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यापैकी खालील ०५ महाविद्यालयांनी दंडाच्या रकमेची पुर्तता प्राधिकरणास केली आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | मांजरा आयुर्वेद महाविद्यालय, लातूर | ०३ |
| २. | सौ. शांतादेवी वेदप्रकाश पाटील आयुर्वेद कॉलेज आणि रिसर्च इंन्स्टिट्यूट, हिंगोली | १० |
| ३. | ज्युपिटर आयुर्वेद मेडिकल कॉलेज, नागपूर | ०७ |
| ४. | हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, कोल्हापूर | १५ |
| ५. | महादेवराव शिवणकर आयुर्वेद मेडिकल कॉलेज, गोंदिया | १० |

परंतु ०२ महाविद्यालयांनी अद्याप दंडाच्या रकमेची पुर्तता प्राधिकरणास केली नाही. अशा महाविद्यालयांचा तपशील खालीलप्रमाणे,-

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १. | के.डी.एम.जी आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव | १९ |
| २. | डॉ. वंदनाताई ढोणे ग्रामीण आयुवेद महाविद्यालय, अकोला | ०१ |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

तसेच, के.डी.एम. जी आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मान. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. ७९१२/२०२३ वरील दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या अंतिम निर्णयाच्या आदेशान्वये संबंधित प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठाची नोंदणी व प्रवेश पात्रता प्रदान करण्यात आले असल्याचे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या दिनांक २४/१०/२०२४ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केले आहे. तथापि, संबंधित महाविद्यालयाने प्राधिकरणाकडे दंडाच्या रकमेची पुर्तता अद्याप केलेली नसून प्राधिकरणाची अंतिम प्रवेश मान्यता संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशास देण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे उक्त न्यायालयीन प्रकरणी मान. न्यायालयाचा अंतिम आदेश झालेला दिसून येत नाही.

वरील बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी खालील महाविद्यालयांनी सद्यस्थितीमध्ये दंडाची पूर्तता केली असल्याने सदरील महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, याबाबतचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | मांजरा आयुर्वेद महाविद्यालय, लातूर | ०३ | १. शिंदे रश्मी प्रेमचंद<br>२. पाटील दिग्विजय तानाजी<br>३. मुट्ठे समाधान बळीराव |
| २. | सौ. शांतादेवी वेदप्रकाश पाटील आयुर्वेद कॉलेज आणि रिसर्च इंन्स्टिट्यूट, हिंगोली | १० | १. औरे प्रिति उमाकांत<br>२. चव्हाण सचिन प्रकाश<br>३.ढोबळे ताई बबनराव<br>४. कारले पवन गजानन<br>५. मगर ऋतुजा विश्वनाथ<br>६. मो.नविद वाजिद मो. साजिद<br>७. पवार रमाकांत शरद<br>८. प्रधान सुप्रिया वैजनाथराव<br>९. रेवाळे कृष्णा भिमराव<br>१०.खंडागळे उज्वल प्रकाश |
| ३. | ज्युपिटर आयुर्वेद मेडिकल कॉलेज, नागपूर | ०७ | १. स्नेहा नगराळे<br>२. हेमेश्वरी मळेकर<br>३. श्रृतिका मुंगळे<br>४. आकांक्षा रहंगाळे<br>५. सोनाली बुटे<br>६. स्नेहल चांदेकर<br>७. वैभव लादे |
| ४. | हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, कोल्हापूर | १५ | १. माने आदिती महादेव<br>२. काळे प्रसाद माणिकराव<br>३. माने ओंकार शिवाजी<br>४. पवार प्राजक्ता विठ्ठल<br>५. कुंडले नरेंद्र बाबसाहेब<br>६. पडूळ मनोज अंकुश<br>७. बोरगावे संतोष रामचंद्र |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थी संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| | | | ८. कुंभार विशाल विष्णू<br>९. गुरव प्रथमेश दिपक<br>१०. सडोलीकर रोहन किशोर<br>११. लवटे संजय सुभाष<br>१२. शेंबडे अक्षय भैरु<br>१३. घाडगे शिवराज ब्रम्हदेव<br>१४. बोचरे प्रविण रामेश्वर<br>१५. चौगुले उध्दव बाबुराव |
| ५. | महादेवराव शिवणकर आयुर्वेद मेडिकल कॉलेज, गोंदिया | १० | १. भेंडाकर जयश्री<br>२. बिसेन अपर्णा<br>३. सेलोकर चेतना<br>४. पटले नेहा<br>५. चरडे ज्ञानदिप<br>६. कंरजेकर प्रिया<br>७. सरकार विकास<br>८. बघेले दिव्या<br>९. बोबडे अनुश्री<br>१०. पात्रे ममता |

तत्कालीन प्राधिकरणाच्या दिनांक १३/०४/२०१६ रोजीच्या निर्णयाची पूर्तता करण्यात आलेल्या वरील प्रवेश प्रकरणी प्रवेश मान्यतेबाबत विद्यापीठास पत्राद्वारे कळविण्यात यावे.

प्रस्तूत प्रकरणी १) के.डी.एम.जी आयुर्वेद महाविद्यालय, जळगाव व डॉ. वंदनाताई ढोणे ग्रामीण आयुवेद महाविद्यालय, अकोला यांनी अद्याप प्राधिकरणाच्या निर्णयानुसार पूर्तता केली नसल्याने सदरील महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत नाही, तथापि या महाविद्यालयांनी अद्याप दंडाची पूर्तता केली नसल्या प्रकरणी खुलासा मागविण्यात यावा.

**विषय क्रमांक ८ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (संदर्भ :- प्राधिकरणाच्या दिनांक ७/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्देश).**

सदरील प्रकरणी चर्चा करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी प्रमाणित केलेले आहेत. परंतू प्राधिकरणाच्या निर्देशानुसार संस्थात्मक / व्यवस्थापन कोटयातील प्रवेश प्राधिकरणाचे सदस्य डॉ. आर. एस. बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठित करुन पुनश्च तपासणी / पडताळणी करण्यात आले होते. पुनश्च पडताळणी दरम्यान महाविद्यालयाने काही कागदपत्रे सादर न केल्याने प्राधिकरणाने दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीत सदर कागदपत्रांची फेरपडताळणी करुन मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश होते. त्यानुषंगाने कागदपत्रे पडताळणी करुन मान्यतेस सादर करण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

सद्यस्थितीमध्ये सदरील प्रकरण प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. दरम्यान प्राधिकरणाच्या दिनांक ७/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक १ मधील निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांस संस्थात्मक / व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित महाविद्यालयांनी सादर केलेली माहिती / कागदपत्रे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी त्यांच्या प्रतिनिधीमार्फत तपासणी / छाननी करुन त्यांचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

<u>विषय क्रमांक ९ :</u> <u>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता संचालनालय स्तरावर नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना मानधन अदा करणेबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या दिनांक २/०५/२०२४ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी दिनांक ९/१०/२०२४ रोजीच्या पत्राने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी महाविद्यालयांकडून प्रत्येकी नोंदणी शुल्क रु. १५००/- आकारण्यासाठी कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

<u>विषय क्रमांक १० :</u> <u>श्री. जयंत मोतीराम पाटील यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये "विशेष कार्य अधिकारी" या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.</u>

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालानुसार श्री. जयंत मोतीराम पाटील यांना रु. ५०,०००/- एवढया दरमहा मानधनावर सीईटी कक्षामध्ये "विशेष कार्य अधिकारी" या पदावर माहे ३१/०५/२०२५ पर्यंत नियुक्ती देण्यास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

<u>विषय क्रमांक ११ :</u> <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील दृष्यकला पदवीच्या प्रथम वर्षामध्ये कुलगुरु यांच्या कोटयातून प्रवेशाबाबत अहवाल.</u>

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक २९/१०/२०२४ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

तथापि, प्रवेश नियमावली पुस्तिकेच्या अनुषंगाने कुलगुरु यांना विद्यार्थी प्रवेशासाठी कोणताही स्वतंत्र कोटा नसतानाही नियमबाह्य दिलेला प्रवेश कायद्यास अनुसरुन नाही. परंतु कु. नम्र नयन जरंडे यांचा प्रवेश रद्द झाल्याची बाब निदर्शनास आल्याने दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करु नये असे ठरले. तसेच, अशा प्रकारचे कृत्य भविष्यात होऊ नये, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

<u>विषय क्रमांक १२ :</u> <u>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत उच्च, तंत्र, वैद्यकीय, कृषी व कला विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५ च्या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन प्रश्नसंच तयार करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या विषय तज्ञ व नियामक यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत.</u>

आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रस्तूत प्रकरणी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. सदरील दरांमध्ये सन २०१६ पासून दरवाढ केली नसल्याचे

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाच्या निदर्शनास आले. या संदर्भात सांगोपांग चर्चा करुन सदरील प्रस्तावास खालील दराप्रमाणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | प्रस्तावित दर | प्राधिकरणाने मान्यता प्रदान केलेला दर |
|---|---|---|---|
| १. | पेपर सेटींग (PHASE-1)<br>1. Item Writer<br>2. Reviewer<br>3. Translators<br>4. Vetter | रु. ६०/- प्रति प्रश्न | रु. ९०/- प्रति प्रश्न |
| २. | Moderator | रु. ४,०००/- प्रति विषय संच ३०० MCQ | रु. ६,०००/- प्रति विषय संच ३०० MCQ |

**विषय क्रमांक १३ :** **प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष या दोन्ही विभागांच्या दैनंदिन कामकाजाचे नियमन करण्यासाठी विनियम तयार करण्याकरिता उपसमिती पुन:र्गठित करण्याबाबत.**

प्रवेश नियमाक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे नियमन करण्याच्या अनुषंगाने "विनियम" शासनाद्वारे प्रसिध्द करण्याबाबत शासनास यापूर्वी वेळोवेळी वारंवार कळविण्यात आलेले आहे, परंतू प्रस्तूत प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नाही. प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांमार्फत राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया राबवित असताना विद्यार्थी/पालक/संस्थाचालक/ हितसंबंधीतघटक यांच्या विविध समस्या व तद्नुषंगाने त्यांच्या शंकाचे निराकरण करत असताना विविध समस्या उद्भवत असून, अधिनियम २०१५ मधील नमूद तरतूदींनुसार हितसंबंधीत घटकांच्या समस्यांचे निराकरण करणे नियम / विनियमाच्या अभावी कठीण होत आहे. तसेच नियम / विनियम उपलब्ध नसल्यामुळे प्रशासकीय व इतर दैनंदिन कामकाज करण्यात अनेक स्वरुपाच्या अडचणी निर्माण होत आहेत.

या अनुषंगाने महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची निर्मिती करण्यात आलेली आहे. अधिनियम, २०१५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेली सर्व कर्तव्ये-जबाबदाऱ्या-कार्ये पार पाडण्यासाठी व इतर दैनंदिन कामकाज यांचे स्वरुप व गांर्भीय लक्षात घेता प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे नियम / विनियम लवकरात लवकर प्रसिध्द होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने अधिनियम २०१५ च्या कलम २४ च्या तरतूदींनुसार विनियम मसुदा तयार करण्यासाठी व कलम २३ च्या तरतूदींनुसार नियम मसुदा तयार करण्यासाठी खालील प्रमाणे उपसमिती गठित करण्यात येत आहे,-

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. राजेंद्र भागवत (भा.प्र.से.) (से.नि.) तथा माजी प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २) | डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई तथा मान. सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई. | सदस्य |
| ३) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे तथा मान. सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई. | सदस्य |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| ४) | श्री. डी.एस. गोमारे, सहसचिव (से.नि.), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५) | सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य | सदस्य सचिव |
| ६) | श्री. एस.के. कविटकर, सहा. कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई. | समन्वयक |

वरील उपसमिती व्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास अतिरिक्त सदस्य / विशेष आमंत्रित नियुक्ती करण्याकरिता सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना अधिकार राहील. तसेच उपसमिती अध्यक्ष यांना बैठकभत्ता रु. ७,५००/- अधिक प्रवास भत्ता व दैनिक भत्ता आणि इतर अशासकीय सदस्यांना बैठकभत्ता रु. ५,०००/- अधिक प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. याबाबत कार्यालयीन आदेश सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी निर्गमित करावेत. उपसमितीने या संदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करुन ०३ महिन्यामध्ये अधिनियमाखाली तयार करण्यात येणारे नियम व विनियम याचे प्रारुप प्राधिकरणास सादर करावे.

**विषय क्रमांक १४ : तंत्र शिक्षण विभागातील विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षांच्या गुणपत्रिकांचे पडताळणी करण्यासाठी शुल्क आकारणी करण्याबाबत.**

सौमय्या विद्यापीठचे के.जे. सौमय्या कॉलेज ऑफ इंजिनियरींग, मुंबई यांनी सादर केलेल्या क्रमांक केजेएसएससी/३२७/२०२४-२५, दिनांक २८/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये काही विद्यार्थ्यांचे एमएचटी-सीईटी-२०२४ चे गुण पडताळणी करुन मिळण्याबाबत विनंती केली होती.

त्या अनुषंगाने महाविद्यालयाने केलेल्या मागणी संदर्भात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडील उपलब्ध दस्ताऐवजानुसार एमएचटी-सीईटी-२०२४ चे गुण निशुल्क पडताळणी करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्रमांक १५ : मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(न्या. वि.एल. अचलिया (से.नि.))
अध्यक्ष,
(अतिरिक्त कार्यभार)
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 23 DEC 2024